नि.दरखास्त क्र. ०३/२००५
मोरेश्वर गणपत देशमुख
वि.
दत्तात्रय हनुमंत देशमुख व इतर

## नि. १८२ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज हा ऋणको यांनी दि. प्र. संहिता कलम ११, आदेश २१ नियम १७, २३, २६, ३४(६)(अ), १०१, आदेश ३४ नियम ६-अ अंतर्गत व कलम १५१ अन्वये दाखल करून दरखास्त अंमलबजावणी पात्र नाही या कारणावरून रक्कम रू. ५०,०००/- च्या खर्चावर फेटाळून लावण्याची विनंती केली आहे.

२. ऋणको यांच्या कथनानुसार रे. द. नं ५/९९ ची दरखास्त ऋणको यांची आर्थिक परिस्थीती चांगली नसल्यामुळे निकाली काढलेली आहे. याच कारणास्तव त्यांनी मुळ दावा नं. ३५/१९९८ यास आव्हान दिलेले नाही. धनको यांची भात गिरणी घर नं. ८३ ही सर्वे नं. ४७३ च्या ७/१२ उता-यावर नोंद नाही. त्यामुळे धनको यांची केस निराधार होते. धनको यांनी घर नं. २३१ अ व ब मध्ये भात गिरणी असल्याची केस मांडली आहे. मुळ दाव्यात त्याचा उल्लेख नाही. त्यामुळे भात गिरणीकडे येणा-या रस्त्यात अडथळा निर्माण केला अशी धनकोची केस नाही. नि. ७५, ७६ व ७७ कडे धनको यांचे विरूध्द पुरावे आलेले आहेत. यापुर्वी तडजोड करून अतिक्रमण काढून रस्ते मोकळे केल्याचा उल्लेख नमुद आहे त्यामुळे नविन कारणाकरीता धनको यांनी वेगळा दावा करणे आवश्यक आहे. याच दरखास्तीमध्ये त्यांना मागणी करता येणार नाही. दावा घर नं. ८३ अस्तीत्वात नाही व ते गट नं. ४७३ या सार्वजनिक मालमत्तेत नाही. घर नं. ८३ मधील भात गिरणी धनको यांनी त्यांच्या मालकीच्या सर्वे नं. ४७४ मध्ये नव्याने तबदील केली आहे त्यामुळे या सर्व कारणामुळे दरखास्त फेटाळुन लावण्याची मागणी ऋणकोने केली आहे.

३. नि. १८३ कडे दरखासदार यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करून अर्ज पूर्णपणे नाकारलेला आहे. त्यांच्या कथनानुसार ऋणको यांचा अर्ज दि. प्र.संहिता कलम ११ च्या कार्यकक्षेत येत नाही. तसेच आदेश २१ नियम १७,२३ व २६ यांची पुर्तता यापुर्वीच झालेली आहे. आदेश २१ नियम २६ प्रमाणे स्थगीती मागण्यापुर्वी ऋणको यांनी वरिष्ठ न्यायालयात मुळ हुकुमनाम्याविरूध्द दाद मागणे आवश्यक होते. आदेश २१ नियम ३४ (६)(अ) या तरतुदी खरेदीखताच्या नोंदणीबाबत आहे त्याचा या दरखास्तीशी काहीही संबंध नाही. आदेश २१ नियम ९७ व नियम १०१ हे स्थावर मिळकतीचा कब्जा घेण्याबाबत आहे. प्रस्तुतची दरखास्त ही स्थावर मिळकतीचा कब्जा घेण्याबाबत नाही. प्रस्तुतची दरखास्त ही सर्वे नं. ४७३ या सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमण काढून टाकण्याकरीता व रस्ता मोकळा करण्याकरीता दाखल आहे. यापुर्वी झालेल्या तडजोडी प्रमाणे तो सार्वजनिक रस्ता आहे व त्यावरील अतिक्रमण काढले आहे ही बाब स्पष्ट होते. दरखास्तदार यांचे घर नं. ८३ सर्व नं. ४७३ च्या लगतच आहे. त्यामधील भात गिरणीच त्यांनी स्थालांतरीत केली आहे. त्यामुळे दरखास्तीचे कारण संपुष्टात आले असे होत नाही व याच कारणास्तव दरखास्तीची अंमलबजावणी थांबवता येणार नाही असे कथन करून अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज वाचला. म्हणणे वाचले. दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

५. मुळ रे. दि. दावा ३५/९८ हा अतिक्रमण काढून टाकण्याकरीता होता. सदर दाव्यातील हुकुमनाम्यानुसार सर्वे नं. ४७३ मध्ये सार्वजनिक रस्ता अस्तीत्वात असल्याचे व त्यावर प्रतिवादी म्हणजेच ऋणको यांनी केलेले अतिक्रमण काढून टाकण्याचा आदेश पारित झालेला आहे. या पुर्वी धनको यांनी हुकुमनाम्याच्या

अंमलबजावणीकरीता रे. द. नं.५/९९ दाखल केली होती. त्यामध्ये ऋणको व धनको यांच्यात आपसात तडजोड होवून ऋणको यांनी अतिक्रमण काढून घेतल्यामुळे ती दरखास्त निकाली काढण्यात आली होती.

६. त्यानंतर ऋणको यांनी पुन्हा वाद रस्त्यावर अतिक्रमण केल्याचे कथन करून दरखास्तदार यांनी प्रस्तुतची दारखास्त दाखल केली आहे. नि. १६१ कडे बेलिफ रिपोर्ट प्राप्त झालेला असून त्यामध्ये ऋणको यांच्या नातेवाईकांनी वाद रस्त्यावर अतिक्रमण केल्याची बाब समोर आलेली आहे. इतकेच नव्हे तर तो अतिक्रमीत कब्जा सुरक्षीत व्हावा याकरीता नि. १७६ कडे ऋणकोच्या नातेवाईकांनी अर्जही दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज न्यायालयाने नामंजुर केलेला आहे. केवळ घर नं. ८३ मधील भात गिरणी धनको यांनी हलवली म्हणून हुकुमनाम्याची अंमलबजावणी होवू शकणार नाही असे ऋणको याचे मत झाल्याचे दिसून येते. तथापि, दरखास्त ही सर्वे न. ४७३ मधील गुरांचा दांड म्हणुन अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमण काढून टाकण्याकरीता असल्याने धनको यांच्या भात गिरणीच्या स्थलांतराबाबतचा यावर कोणताही परिणाम होवू शकत नाही.

७. यापुर्वी दरखास्त तडजोडीने निकाली झाल्यानंतरही ऋणको यांनी पुन्हा अतिक्रमण केल्याची बाब कागदपत्रांसहित समोर आली असल्याने केवळ दरखास्तीच्या अंमलबजावणीस विलंब व्हावा या एकमेव हेतुनेच प्रस्तुतचा अर्ज दिल्याची बाब स्पष्ट होते. ऋणको यांनी त्यांच्या अर्जामध्ये ज्या कायदेशीर कलमांचा उल्लेख केलेला आहे ती कलमे प्रस्तुत दरखास्तीस लागू होत नाही. या बाबत धनको यांच्या वकिलांनी केलेला युक्तिवाद मान्य करण्यात येतो. मुळ रे. दि. दावा ३५/९८ विरूध्द ऋणको यांनी अपिल

नि.दरखास्त क्र. ०३/२००५
मोरेश्वर गणपत देशमुख
वि.
दत्तात्रय हनुमंत देशमुख व इतर

केले नसल्यामुळे व तो निकाल आता अंतिम झालेला असल्यामुळे त्याबाबत किंवा त्या हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीबाबत आक्षेप उपस्थित करण्याचा कायदेशीर अधिकार ऋणकिो यांना राहत नाही. ऋणको यांच्या अर्जामुळे दरखास्त अंमलबजावणीचे काम निष्कारण लांबले असल्यामुळे ऋणको यास रक्कम रू. १०००/- चा खर्च लावून अर्ज नामंजुर करणे योग्य होईल. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**:- आदेश -:**

| | |
|---|---|
| **१.** | अर्ज रक्कम रू. १०००/- च्या खर्चावर नामंजुर करण्यात आला. |
| **२.** | ऋणको यांनी सदरचा खर्च धनको यास पुढील नेमले तारखेस न चुकता देणेचा आहे. |

URMILA PARASHRAM KOLI
Digitally signed by URMILA PARASHRAM KOLI
Date: 2026.05.08 18:10:57 +0530

दि. ०८.०५.२०२६

**श्रीमती यु.पी.कोळी**
सह दि. न्या.क.स्तर. शहापूर

**प्रमाणपत्र**

आदेशाची तारीख :- ०८/०५/२०२६
तपासण्याची तारीख :- ०८/०५/२०२६
सही केलेली तारीख :- ०८/०५/२०२६
अपलोड केल्याची तारीख :- ०८/०५/२०२६
प्रमाणित करण्यात येते की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मुळ शब्द न शब्द न्यायनिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे जशास तसा खरा व बरोबर आहे.
न्यायालयाचे नावः- सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, शहापूर
दिनांक-:- ०८/०५/२०२६
स्थळ - शहापूर

(लघुलेखिका नि.श्रे.)
एस.एस. काकडे